**दोषारोप निश्चीती पुर्वीचा पुरावा**

**फिर्यादी तर्फे साक्षीदार क्र. ०४ चा सरतपासः-**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देते की,

माझे नावः – बाबासाहेब भिमराव ईनकर

वय – ३३ वर्षे, व्यवसाय- नोकरी

पत्ता – शास्त्री नगर, नारवंडी नाका, बिड

**फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास विधीज्ञ श्री. जी. आर. सांळूके यांचे मार्फत सुरुः-**

१. मी पिक विमा कंपनी मुंबई येथे विभागीय समन्वयक म्हणूण काम करतो. सध्या मी संभाजी नगर विभागामध्ये कार्यरत आहे. सन २०१६ पासून शासनाची प्रधानमंत्री फसल योजना सुरू आहे. मला न्यायालयाचे समन्स मिळाले. त्यामध्ये नमुद असलेल्या अबाजी मधूकर खोमणे, मधुकर विठ्ठल खोमणे यांनी मेल द्वारे आमच्या कार्यालयाकडे सन २०१९ मधील प्रधानमंत्री फसल योजनेतील विमा रक्कम मिळाली नाही म्हणूण तिन अर्ज पाठवले होते. त्या अर्जासोबत त्यांनी तिन विमा रक्कम भरल्याच्या पावत्या पाठवल्या होत्या. त्या पावत्यांचा नंबर अनुक्रमे – ०४०१२७१९००१०६१०६५१५ अबाजी खोमणे यांच्या नावे, ०४०१२७१९००१०६१०१०१५ मधुकर विठ्ठल खोमणे यांच्या नावे आणि ०४०१२७१९००१०६१०६५९० प्रयागबाई खोमणे यांच्या नावे होत्या. अबाजी खोमणे यांनी त्या पावती नुसार विमा हप्ता रक्कम रुपये १०९४/- भरला होता व त्याची संरक्षीत रक्कम रुपये ५४,७००/- होती. तसेच त्यांचे विमा संरक्षण क्षेत्र १ हेक्टर ६० आर होते. मधुकर विठ्ठलराव खोमणे यांनी त्या पावती नुसार विमा हप्ता रक्कम रुपये १२२५/- भरला होता व त्याची संरक्षीत रक्कम रुपये ६१,२५०/- होती. तसेच त्यांचे विमा संरक्षण क्षेत्र १ हेक्टर ७६ आर होते. प्रयागबाई खोमणे यांनी त्या पावती नुसार विमा हप्ता रक्कम रुपये ५५९/- भरला होता व त्याची संरक्षीत रक्कम रुपये २७,९५०/- होती. तसेच त्यांचे विमा संरक्षण क्षेत्र ० हेक्टर ९० आर होते. तक्रार प्राप्त झाल्यानंतर तक्रारदाराच्या पावती नुसार एन.सी.पी. पोर्टल वर सदर विमा प्रकरणाची छानननी केली होती. वरील तिन पावत्यांचे नंबर असणारे विमा अर्ज हे मधुकर खोमणे, अबाजी खोमणे आणि प्रयागबाई खोमणे यांच्या नावे नव्हते तर ते विमा अर्ज अन्य व्यक्तीच्या नावे होते. अर्ज क्रमांक ०४०१२७१९००१०६१०६५१५ हा ज्ञानदेव विठ्ठल पाटे अहमदनगर, अर्ज क्रमांक ०४०१२७१९००१०६१०१०१५ हा बाबासाहेब दत्तू

कदम सांगली आणि अर्ज क्रमांक ०४०१२७१९००१०६१०६५९० हा भिमा धर्मा खुमरे चंद्रपूर यांच्या नावे होता असे दिसून आले. अर्जदारांच्या अर्जास आमच्या कार्यालयातून दिनांक २९.०६.२०२० रोजी मेल द्वारे उत्तर पाठवले होते. तो मेल रविंद्र कुदळे उपप्रबंधक मुंबई क्षेत्रीय कार्यालय यांनी पाठवला होता. तो मेल suraj03khomne@gmail.com वरती पाठवला होता. तक्रार दारांच्या पिक विमा हप्ता पावत्या या आमच्या कडील पोर्टल वरील पावत्यानुसार विसंगत होत्या त्या मधील पिकविमा धारक वेगळे होते त्यामुळे आम्ही त्यांना पिक विमा संरक्षीत रक्कम परत केली नव्हती. आमच्या कार्यालयातून तक्रार दारांना मेल द्वारे पाठवलेल्या उत्तराची प्रत मी आज रोजी सोबत आणली आहे. ती प्रत मी दाखल करण्यास तयार आहे. तक्रार दारांनी आमच्या कार्यालयाकडे तक्रार अर्जासोबत पाठवलेल्या पावत्या मी आज रोजी सोबत आणल्या आहेत. त्या पावत्यांची प्रत मी दाखल करण्यास तयार आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे दोषारोप निश्चीतीपर्यंत राखून ठेवला.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by APARNA SHIVAJI GUNJAVATE
Date: 2025.09.02 10:40:23 +0530

(**श्रीमती.ए.एस.गुंजवटे**)

दिनांक २९/०८/२०२५. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१, निलंगा